नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०१/०९/२०२२ (गुरूवार)**

**(सकाळ)**

---

## घरफोडी

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत १.५ कि. मी. अंतरावरील येथे दिनांक २८/०८/२२ चे २२.०० वा. ते ३१/०८/२२ चे ०७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— नितीन नरेशकुमार गर्ग वय २४ वर्ष रा. साठोने ले आउट सरस्वती नगर, काटोल ता. काटोल हे आपले परिवारासह देवदर्शना करिता त्रयंबकेश्वर जि. नाशिक येथे घराला व लोखंडी गेटला कुलुप लावून गेले होते. ते देवदर्शन करून दि. ३१/०८/२२ चे सकाळी ०७.०० वा. घरी परत आले. तेव्हा वॉल कपांउडचे गेटला कुलुप लावून होते मेन दरवाजाचे कुलुपचा कोंडा कडी तुटलेला दिसला व सेटंर लॉक तुटलेला दिसला आतमध्ये जावून पाहिले असता, लोखंडी कपाटातील सोन्या—चांदिचे दागिने कि. १,९०,०००/—रू. व नगदी ३०,०००/—रू. असा एकुण कि. २,२०,०००/—रूपयाचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने घरात आतप्रवेश करून घरातील लोखंडी व लाकडी कपाटातील माल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री परमेश्वर आगासे मो.नं. ८४४६२८३९२५ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत वार्ड क्र. १ सावता मंदीर मागे प्रविण खडसे यांचे घरी किरायाने येथे दिनांक १४/०६/२०२२ चे १०.०० वा. ते दिनांक १८/०७/२०२२ चे २०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— सौ. पुष्पा नरेश गिरी, वय ४० वर्ष, रा. वार्ड क्र. १, सावता मंदीर मागे प्रविण खडसे यांचेघरी किरायाने हीने घरातील लोखंडी कपाटात लॉकर मध्ये सोन्या—चांदीचे दागिने कि. ६०,०००/—रू. मुद्देमाल ठेवले होते. फिर्यादीच्या दिरची प्रकृती खराब असल्याने त्यांना पाहण्याकरीता पैसे नसल्याने सोन्याची अंगठी गहान ठेवण्याकरिता कपाटातील लॉकर मध्ये वरील सोन्याची दागीने दिसले नाही. संशयीत सौ. राजश्री गजानन निमजे हीने फिर्यादीचे सोन्याचे दागिने कि. ६०,०००/—रू. चे चोरून नेले असावे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास ग्रेड पोउपनि प्रकाश हिवरकर ब.नं. ९८८१५९५९९९ हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत केईसी कंपनी समोर येथे दिनांक २५/०८/२०२२ चे ०९.०० वा. चे १४.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— अजित विक्तुजी नागपूरे, वय २६ वर्ष, रा. वार्ड नं. ०४ बुटीबोरी याने आपली एमएच— ४०/ऐवाय—९५९१ क्रमांकाची हिरो कंपनीची काळया रंगाची मोटाररसकल केईसी कंपनी समोर उभी ठेवली होती. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची किंमती १२,०००/—रू. ची मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार किशोर डेकाटे मो. नं. ७४९८०२०३९९ हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. मौदा :—** दिनांक ०१/०३/२०२१ ते १३/०८/२०२२ चे १०.०० ते ११.०० वा. दरम्यान फिर्यादी/पीडित वय २५ वर्ष ही घरी हजर असतांना आरोपी नामे— शैलेश भगवान ठोके, वय ३० वर्ष, रा. कडोली याने तिचे घरी अनाधिकृतपणे प्रवेश करून 'फिर्यादीला पॅन कार्ड बनवायचे आहे का? तसेच माझ्या सोबत बोलत जा' असे म्हणून तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४५२ ३५४ ३५४(1) (i) ३५४ (D) (1) ५०६ भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि ठाकुर मो.क्र. ७०८३१५१९९३ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

**१) पो.स्टे. खापरखेडा :—** अंतर्गत मौजा खापापाटन येथे दि. २७/०८/२०२२ चे २०.२० वा. सुमारास **प्रशांत भीमराव गोंडे (मृतक), वय ४२ वर्ष, रा. खापापाटन** हा ४ ते ५ दिवसापासुन सतत दारू पीत होता. तो दारूचे नशेत असतांनी कुठुनतरी त्याने विषारी औषध प्राषण केले व स्वताचे राहते घरी येवुन झोपला असता दि २७.०८.२२ चे २०.०० वा. सुमारास त्याचे तोंडातुन फेस निघत होते. त्यास उपचाराकरीता मेयो हॉसपीटल नागपुर येथे नेले तेथील डॉक्टरांनी तपासुन दि २७.०८.२२ चे २०.४५ वा. उपचारापुर्वी मृत्यु केले. सदर मृतकाचे पीएम करून दि ३१/०८/२०२२ चे सकाळी १०.०० वा. टपाल दवारे कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग दाखल करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा नझीर कुरेशी मेयो पोलिस बुथ नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार शरद डोंगरे मो.क्र. ९५५२११७७७० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. मौदा :**– अंतर्गत ०९ कि. मी. अंतरावरील मौजा नानादेवी शिवार कन्हान दिनांक २९/०८/२०२२ ते दिनांक ३१/०८/२०२२ चे १२:०० वा. सुमारास **संकेत श्रावण नारनावरे (मृतक), वय २२ वर्ष, रा. आजनी कामठी** याला पैश्याची खुप तंगी असल्याने त्याने या कारणावरून कन्हान नदीच्या पात्रात पाण्यात उडी मारल्याने तो मृत अवस्थेत आढळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– जयबिंद्र सोमाजी गायकवाड, वय ४० वर्ष, रा. आजनी ता. कामठी जि. नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार देशमुख मो.क्र. ९९२२४४७०४५ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. केळवद** :– अंतर्गत ढालगाव खैरी त. सावनेर येथे दिनांक ३१/०८/२०२२ चे ०९.०० वा. सुमारास फिर्यादी **सुरेश गिरधर ताजने(मृतक) वय ३० वर्ष रा. ढालगाव खैरी त. सावनेर** हा आपल्या शेतात कापसाच्या पिकावर किटकनाशक औषध फवारणी करित असतांना दारुच्या नशेत किटकनाशक औषध प्राशन केली. त्यास गावातील लोकांच्या मदतीने सरकारी दवाखाना सावनेर येथे डॉक्टरांनी सुरेशला तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गिरधर ताजने, वय ६० वर्ष रा. ढालगाव खैरी त. सावनेर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार सुभाष राठोड मो.क्र. ९८२३१८२४९९ हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत रायनगर कन्हान येथे दिनांक ३१/०८/२०२२ चे १२.०० वा. पुर्वी फिर्यादी चे वडील नामे– **रामचंद्र उरकुडा सायरे (मृतक), वय ६० वर्ष रा. रायनगर कन्हान** हा दारू पिण्याचे सवयीचा असून त्याने दारूच्या नशेत आपले राहते घरी लोखंडी पाईपला नाईलॉनच्या दोरीने बांधुन गळयात गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शुभम रामचंद्र सायरे, वय २८ वर्ष, रा. रायनगर कन्हान यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. कन्हान येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक मंगेश ढबाले मो.क्रं. ९९२३६२१२७५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**